महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

RNI-MAHMAR/2023/89125

epaper.shauryamarathi.com | जळगाव, धुळे, नंदुरबार | सोमवार, दि. १६ फेब्रुवारी २०२६ | वर्ष २ रे | अंक ९८ किंमत : ५ रु. | पाने ४


## दिन विशेष...

१७४५ : थोरल्या माधवराव पेशव्यांचा जन्मदिन.
१८२२ : बोटांच्या ठशांचे वेगवेपण सिध्द करणाऱ्या सर फ्रान्सिस गाल्टन यांचा जन्मदिन.
१८७६ : रँगलर परांजपे यांचा जन्म झाला.
१९४४ : दादासाहेब फाळके यांचा स्मृतिदिन.
१९५६ : सुप्रसिध्द शास्त्रज्ञ मेघनाथ साह्य यांचे निधन.

सेन्सेक्स ८२,६२६.७६ -१,०४८.१६(१.२५%)
डॉलर ₹ ९०.५६

आजचे तापमान (डिग्री सेल्सिअस)

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| जळगाव | ३५ | १६ |
| दिल्ली | २९ | १३ |
| मुंबई | ३४ | २१ |
| नागपूर | ३२ | १७ |
| पुणे | ३४ | १२ |

## सुविचार

अबालवृध्द मनुष्याची विविध संघर्षातूनच सामर्थ्याची खरी परीक्षा होते.

सूर्योदय - सूर्यास्त
स.-६:५८ संध्या-६:२६

## सोने - चांदी

सोने(१० ग्रॅम) - चांदी (प्रति किलो)
१,५७,१९५/- २,७५,०००/-

## केळी भाव

नवती : १३५५ ते १३६०
पिल बाग : ११०१ ते ११०२
कांदे बाग : ----

## थोडक्यात

### तेलंगणातही चालली सहर शेखची जादू...

**ठाणे** । महाराष्ट्रात नुकत्याच पार पडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये ओवेसी यांच्या एमआयएम पक्षाचे १२० पेक्षा जास्त नगरसेवक जिंकून आले आहेत. महाराष्ट्र पाठोपाठ तेलंगणा येथील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पार पडल्या. या निवडणुकांमध्ये देखील एमआयएम पक्षाला ६० हून अधिक जागांवर विजयी मिळवता आला आहे. या निवडणुकीच्या प्रचारासाठी ठाण्यातील नवनिर्वाचित नगरसेविका सहर शेख या मैदानात उतरल्या होत्या.

### पाकिस्तानच्या खेळाडूंशी हँडशेक नाहीच

**मुंबई** । टी वर्ल्डकपच्या कोलंबोतल्या लढतीदरम्यान पाकिस्तानच्या खेळाडूंशी हस्तांदोलन न करण्याचा निर्णय भारतीय संघाने घेतला आहे. सर्वसाधारणपणे टॉसच्या वेळी दोन्ही कर्णधार एकमेकांशी हस्तांदोलन करतात. सामना संपल्यानंतर शिष्टाचाराचा भाग म्हणून खेळाडू एकमेकांशी हस्तांदोलन करतात. मात्र भारतीय संघ पाकिस्तानविरुद्ध यापैकी काहीही करणार नसल्याचं समजतं.

# लोकसभा अध्यक्षांविरोधातील अविश्वास प्रस्तावावर ९ मार्चला मतदान

## विरोधकांनी सभागृहाचे कामकाज चालू दिले नाही तर गिलोटिनचा वापर केला जाईल : मंत्री रिजिजू

वृत्तसंस्था । नवी दिल्ली

**लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला यांच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या अविश्वास प्रस्तावावर ९ मार्च रोजी चर्चा आणि मतदान होणार आहे. त्यामुळे ९ मार्चपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे सुरू होणारा दुसरा टप्पा महत्त्वाचा ठरणार आहे. कारण या दरम्यान अनेक महत्त्वाची विधेयके सादर केली जाणार आहेत, अशी माहिती केंद्रीय संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी रविवारी ही माहिती दिली.**

**...तर गिलोटिनचा वापर करणार**

९ मार्च २०२६ रोजी आम्ही लोकसभेत सभापतींविरुद्ध मांडलेल्या अविश्वास प्रस्तावावर चर्चा करू. सभागृहाच्या



नियमांनुसार अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी या प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल. त्यावेळी चर्चेनंतर अविश्वास प्रस्तावावर मतदान घेतले जाईल.

ते पुढे म्हणाले की, जर विरोधकांनी सभागृहाचे कामकाज चालू दिले नाही तर विशेषाधिकाराचा (गिलोटिन) वापर केला जाईल, म्हणजेच विधेयके चर्चेशिवाय मंजूर होतील. हा विरोधकांना मोठा धक्का असेल. जर विरोधकांनी चर्चेत भाग घेतला नाही तर ते त्यांचे स्वतःचे नुकसान करतील.

**गिलोटिन म्हणजे काय?**

भारताच्या संसदीय कामकाजात गिलोटिन ही महत्त्वाची प्रक्रिया आहे. ती अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान वापरली जाते. याद्वारे अर्थसंकल्पावरील चर्चा न झालेल्या उर्वरित मागण्यांवर थेट मतदान घेऊन त्या वेळेत मंजूर केल्या जातात. ही प्रक्रिया अर्थसंकल्प मंजूर करण्याची प्रक्रिया जलद करण्यासाठी आणि विहित वेळेत पूर्ण करण्यासाठी वापरली जाते.

### ➤ विरोधकांमध्ये फूट!

रिजिजू म्हणाले, सभागृहातील छोटे पक्ष कामकाजात व्यत्यय आणण्याचे बाजूचे नाहीत. तसेच रिजिजू यांनी विरोधी पक्षांच्या एकतेत संभाव्य फूट पडण्याचे संकेत देत सांगितले की, तृणमूल काँग्रेसने लोकसभेच्या सभापतींविरूद्धच्या अविश्वास प्रस्तावावर स्वाक्षरी केलेली नाही. बहुतेक लहान पक्ष सभागृहात व्यत्यय आणण्याच्या बाजूने नाहीत. त्यांना त्यांचे मुद्दे उपस्थित करायचे आहे.

# नाशिक येथे २७ फेब्रुवारीपासून चौथे विश्व मराठी संमेलन



वृत्तसंस्था । नाशिक

**ज्ञानपीठ पुरस्कारप्राप्त कवी कुसुमाग्रज यांच्या नाशिक नगरीत चौथे विश्व मराठी संमेलन होणार आहे. या संमेलनात तीन दिवस भरगच्च कार्यक्रम ठेवण्यात आले आहेत. संमेलनासाठी विविध समित्यांची स्थापना करण्यात येणार आहे. नाशिकच्या वैभवात भर घालेल, असे संमेलन होण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येणार आहेत.**

नाशिक येथील मराठा विद्या प्रसारक संस्थेच्या आय. एम. आर. टी. सभागृहात चौथ्या विश्व मराठी संमेलन आयोजनाबाबत राज्याचे उद्योग, मराठी भाषा मंत्री डॉ. उदय सामंत यांनी रविवारी साहित्यिकांशी संवाद साधला. मंत्री सामंत यांनी संमेलनाच्या तारखाही जाहीर केल्या.

मराठी भाषा व साहित्याचा विकास, जागतिकीकरणाच्या युगातील मराठीची भूमिका, तंत्रज्ञानातील मराठीचा वापर, शिक्षणातील मातृभाषेचे स्थान तसेच सांस्कृतिक वारशाचे जतन व संवर्धन या विषयांवर विविध परिसंवाद, चर्चासत्रे, व्याख्याने व संवाद सत्रांचे (पान २ वर)

# पुण्यात भाजपा-काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने


## हर्षवर्धन सपकाळांच्या 'त्या' वक्तव्यावरून वाद पेटला; आंदोलनादरम्यान दगडफेक

वृत्तसंस्था । पुणे

**काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी टिपू सुलतानची थेट छत्रपती शिवाजी महाराज यांच्याबरोबर तुलना करणारे वक्तव्य केल्यानंतर राज्यात चांगलंच राजकारण तापलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्यावर बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी देखील हर्षवर्धन सपकाळ यांच्यावर जोरदार टीका केली.**

दरम्यान, हर्षवर्धन सपकाळ यांच्या वक्तव्याचा निषेध करत भाजपाच्या कार्यकर्त्यांकडून आज राज्यभरात आंदोलन करण्यात येत आहे. पुण्यात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज आंदोलन केलं. मात्र, यावेळी भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्याने मोठ्या प्रमाणात तणाव निर्माण झाल्याचं पाहायला मिळालं.

भाजपाच्या कार्यकर्त्यांनी पुणे काँग्रेस भवनाच्या बाहेर आंदोलन करत जोरदार




घोषणाबाजी केली. यावेळी आंदोलनाला हिंसक वळण लागल्याचा आरोप करण्यात आला आहे. या आंदोलनावेळी दगडफेक आणि बाटल्या फेकल्याचा आरोप काँग्रेसने केला आहे. यामध्ये काही कारच्या काचा फुटल्या, तसेच गाड्यांचं मोठं नुकसान झालं आहे. तसेच काँग्रेसच्या एका कार्यकर्त्यांला दगड लागल्याने तो रक्तबंबाळ झाल्याचीही माहिती समोर येत आहे.

दरम्यान, भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे पुण्यात काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता. मात्र, त्यानंतर पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रण मिळवलं असून आता तणावपूर्ण शांतता आहे. काँग्रेस भवनाच्या बाहेर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आलेला आहे. भाजपाच्या एका पदाधिकाऱ्याने माध्यमांशी बोलताना म्हटलं की, 'काँग्रेसकडून आधी दगडफेक करण्यात आली. काँग्रेसचे लोक आक्रमक (पान २ वर)

### ➤ गुन्हा दाखल करण्याची मागणी

**भाजपा आणि काँग्रेसचे कार्यकर्ते आमने-सामने आल्यामुळे काही वेळ मोठा गोंधळ आणि तणाव निर्माण झाला होता. यानंतर काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी पोलीस ठाण्यात जाऊन भाजपाच्या पदाधिकाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे.**

# काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांची अंत्ययात्रा काढून भाजपने केला निषेध

प्रतिनिधी । जळगाव




**छत्रपती शिवाजी महाराज यांची तुलना हिंदू विरोधी टिपू सुलतान यांच्याशी करून तमाम हिंदू प्रेमी व राष्ट्रीय प्रेमी बांधवांचा अपमान काँग्रेसचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. याच्या निषेधार्थ आज दि.१५ फेब्रुवारी रोजी दुपारी ४ वाजता भाजपा जुने वसंत स्मृती कार्यालय इथून हर्षवर्धन सपकाळ यांची प्रतिकात्मक अंत्ययात्रा काढून करण्यात आली.**

याप्रसंगी तिरडीवर हर्षवर्धन सपकाळ यांचा प्रतिकात्मक पुतळा ठेवून त्यांची अंत्ययात्रा काढण्यात आली. या तिरडीचे आग्या म्हणून महेश चौधरी हे झाले होते. तिरडीला आ. सुरेश भोळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी, ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ. राधेश्याम चौधरी, महापौर दीपमाला काळे, जिल्हा सरचिटणीस विशाल त्रिपाठी, राहुल वाघ, नितीन इंगळे, राजेंद्र मराठे ,आनंद सपकाळे, मनोज भांडारकर, मुकुंद मेटकर, चंदू महाले, अजित राणे, निलु आबा तायडे, विनोद मराठे, प्रकाश पंडित यांनी खांदा दिला. तसेच टॉवर चौकात प्रतिकात्मक अंत्ययात्रा आल्यानंतर याठिकाणी मंगला बारी व महिला कार्यकर्त्यांनी रडून काँग्रेसचा जाहीर निषेध केला. या अंत्ययात्रेप्रसंगी भाजपचे सर्व नगरसेवक, जिल्हा पदाधिकारी, युवा मोर्चा, महिला आघाडी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कुंभमेळ्यात महिलांची सुरक्षा सर्वोच्च स्थानी

## विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांचे प्रशासनाला कडक आदेश



वृत्तसंस्था । नाशिक

**नाशिक - त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यात देश-विदेशातून महिला भाविक येतील. या भाविकांच्या संरक्षणासाठी सर्वतोपरी उपाययोजना कराव्यात, महिलांसाठी मदत केंद्रे, हिरकणी कक्ष, स्वच्छता गृहांची सुविधा असावी. तसेच दिव्यांगासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, अशा सूचना विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलमताई गोऱ्हे यांनी दिल्या.**

नाशिक परिक्षेत्र विशेष पोलीस महानिरीक्षक कार्यालयात डॉ. गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली नाशिक विभागाची बैठक पार पडली. यावेळी विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त सौरिश सहाय, नाशिक ग्रामीणचे अपर पोलिस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, नाशिक शहर पोलीस (पान २ वर)

➤ रेल्वे प्रवासात महिलांशी निगडित काही अप्रिय घटना घडू नये. अशा घटना टाळण्यासाठी रेल्वे व पोलीस दलाने नियमितपणे संवाद साधावा. दक्षता समिती, नागरी हक्क संरक्षण समितीच्या बैठकांमध्ये महिलांच्या समस्या प्राधान्याने सोडवाव्यात. विद्यार्थिनींच्या सुरक्षिततेसाठी रिक्षा, शालेय बसची प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांच्या सहकार्याने नियमितपणे तपासणी करावी. तसेच महिला अत्याचाराच्या घटनांचा सखोल तपास करून दोष सिद्धीचे प्रमाण अधिक वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करावेत, असेही त्यांनी सांगितले.

# बांगलादेशच्या पंतप्रधानांच्या शपथविधीला मोदी जाणार नाहीत

वृत्तसंस्था । नवीदिल्ली

बांगलादेश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) चे प्रमुख तारिक रहमान यांच्या १७ फेब्रुवारी रोजी होणाऱ्या शपथविधी सोहळ्यासाठी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना निमंत्रण देण्यात आले आहे. मात्र, त्याच दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा मुंबईत नियोजित दौरा आहे. त्यामुळ ते बांगलादेशातील पंतप्रधानांच्या शपथविधी सोहळ्यासाठी जाणार नाहीत. मात्र, भारत सरकारकडून एका महत्त्वाच्या नेत्याला बांगलादेशात पाठवण्यात येणार आहे. भारताचे प्रतिनिधी म्हणून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना पाठवण्यात येणार आहे. भारत सरकारने रविवारी हा निर्णय घेतला. बांगलादेशातील मोहम्मद युनूस यांच्या अंतरिम सरकारने पंतप्रधान तारिक रहमान यांच्या शपथविधीला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आमंत्रित केले होते.

# फ्रान्समधील शिक्षकाचा ८९ विद्यार्थ्यांवर लैंगिक अत्याचार



## • पीडितांमध्ये भारतीयांचाही समावेश

वृत्तसंस्था । पॅरिस

**फ्रान्समधील एका शिक्षकाने ८९ अल्पवयीन मुलांवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. पीडितांमध्ये भारतासह इतर नऊ देशांमधील मुलांचा समावेश असल्याचे सांगितले जात आहे.**

जॅक लेवुग्ल, असे या आरोपी शिक्षकाचे नाव असून, तो फेब्रुवारी २०२४ पासून पोलिसांच्या ताब्यात आहे. फ्रान्समधील सरकारी अधिवक्ता एटिएन मंटो यांनी हे प्रकरण सार्वजनिक करताना पीडितांना पुढे येण्याचे आवाहन केले आहे. आरोपीकडे सापडलेल्या पेन ड्राइव्हमधील (पान २ वर)

### ➤ भारतातील मुलांवरही लैंगिक अत्याचार

आरोपी जॅक हा भारतात शिकवणीला असताना त्याने १० ते १२ मुलांवर अत्याचार केल्याची कबुली दिली आहे. त्याशिवाय रशियामधील किमान १० गरीब विद्यार्थिनींचे जॅकने लैंगिक शोषण केल्याचे उघड झाले आहे. १९७१ ते १९७५ या कालावधीत अल्जेरियात काम करताना आरोपीने दोन तरुणींवर अनेकदा बलात्कार केला आहे. इंडिया टुडेच्या वृत्तानुसार, जॅकने त्याच्या दोन नातेवाइकांच्या हत्येची कबुलीही दिली आहे. १९७० मध्ये आई कर्करोगाने ग्रस्त असताना जॅकने तिचीही उशीने तोंड दाबून हत्या केली आहे. त्यावेळी आरोपी जॅकचे वय अवघे २८ वर्षे होते. या दोन्ही प्रकरणांमध्ये पोलिसांनी स्वतंत्रपणे हत्येचा गुन्हा दाखल करून, तपास सुरू केला आहे.

# रसायनांपासून दूध बनवणाऱ्या संकलन केंद्रावर छापा

## तिघांना अटक; १७.३२ लाखांचा ऐवज जप्त

वृत्तसंस्था । अहिल्यानगर

**मानवी आरोग्यास अपायकारक अशा रसायनयुक्त दूध तयार करून त्याची फक्राबाद (ता.जामखेड) येथील दूध संकलन केंद्रात भेसळ होत असताना अन्न सुरक्षा अधिकारी व पोलिसांच्या पथकाने छापा टाकून तिघांना अटक करण्यात आली. या तिघांकडून एकूण १७ लाख ३२ हजार ८१६ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.**

त्यामध्ये ११९८ लिटर पॅरॅफिन ऑईल, त्याची किंमत २ लाख ३९ हजार रुपये आहे. तसेच ३०० किलो वजनाची पांढऱ्या रंगाची पावडर, त्याची किंमत ८१ हजार ५६ रुपये आहे. रसायनांपासून तयार केलेले ३२० लिटर दूध, त्याची किंमत १२ हजार १६० रु., तसेच दोन वाहनांचा जप्त मुद्देमालामध्ये समावेश आहे. समीर कमरूद्दीन शेख (वय ३०, उंबरे, ता. राहुरी, अहिल्यानगर), अफताफ कलीम शेख (वय २८, शुक्लेश्वर चौक, राहुरी) व रामदास नवनाथ उबाळे (वय ४६, फक्राबाद, जामखेड) अशी अटक करण्यात आलेल्या तिघांची नावे आहेत.

रामदास उबाळे हा हे दूध संकलन केंद्र चालवत होता. कारवाई वेळी तोही तेथे उपस्थित होता. दूध संकलन केंद्रात जप्त करण्यात आलेल्या



११९८ लिटर पॅराफीन केमिकलपासून २४ हजार लिटर दूध तयार होणार होते. पॅरॅफिन ऑईल व पांढऱ्या पावडरचा उपयोग कृत्रिमरीत्या दुधाची फॅट व एसएनएफ वाढवण्यासाठी केला जातो. समीर शेख व अफताफ शेख हे दोघे पॅराफीन ऑईल व पांढऱ्या रंगाची पावडर घेऊन फक्राबाद येथील दूध संकलन केंद्रात आले होते. त्याचा वापर रसायनयुक्त दूध तयार करण्यासाठी होत असल्याचे अन्नसुरक्षा अधिकारी राजेश बडे यांनी सांगितले. बडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार जामखेड पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घाडगे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी, अन्न सुरक्षा (पान २ वर)

## संपादकीय

### कोंडी टाळली

राहुल गांधी यांच्या विरोधात विशेषाधिकार प्रस्ताव न आणण्याचा निर्णय भाजपने घेतला आहे. तसे करून सरकारने संभाव्य कोंडीतून आपली सुटका करून घेतली. त्याचे कारण म्हणजे मागच्या काही दिवसांतील घडामोडी सरकारला बॅकफूटवर नेणाऱ्या होत्या. त्यात राहुल गांधी यांचा जेवढा वाटा होता, त्यापेक्षा अधिक वाटा स्वत: भाजपचा होता. राहुल यांनी सभागृहात पहिल्यांदा निवृत्त लष्करप्रमुख जनरल एम.एम. नरवणे यांचा मुद्दा उपस्थित केल्यावर त्याचवेळी सरकारला तो विषय सन्मानाने परतवून लावण्याची संधी होती. सरकार त्यावर चर्चा न करताही आपली बाजू मांडू शकत होती. ती संधी त्यांनी दवडली. राहुल यांनी पहिला गोल तेव्हाच केला होता. बुधवारीही त्यांनी सरकारवर जोरदार आक्रमण केले. त्यामुळे सरकारची पुरती भंबेरी उडाल्याची दिसले. सभागृहात आणि त्यापेक्षा बाहेरच अधिक भाजपचे अनेक नेते राहुल यांच्या विरोधात बोलताना दिसले. त्यांच्या विरोधात हक्कभंग प्रस्ताव आणण्याचे सूतोवाच सरकार पक्षाकडून केले गेले. वास्तविक तसे झाले असते तर सरकारची ती मोठी चूक ठरली असती. ती त्यांनी टाळली आहे. योग्य वेळी त्यांनी स्वत:ला रोखले याकरता सरकारचे अभिनंदन. आता भाजपचे बोलघेवडे खासदार निशिकांत दुबे काय म्हणतात आणि त्यांचीच तळी उचलणारांचे व आपले स्वत:चे इतर मुद्दे रेटण्याचा प्रयत्न 'काही' माध्यमांकडून अथवा समाजमाध्यमांकडून होईल. तथापि, नरवणेंच्या पुस्तकावर राहुल यांना बोलण्यापासून रोखल्यामुळे जी एकप्रकारची राजकीय आत्महत्या सरकार पक्षाकडून झाली होती, तेवढी गंभीर चूक आता झाली नाही हा बोनस. नरवणेंचे पुस्तक प्रसिद्ध झाले नसल्यामुळे त्यावर सभागृहात चर्चा होऊ शकत नाही असे सरकारचे म्हणणे होते. किंवा त्या अप्रकाशित मजकुराच्या अनुशंगाने बोलता येणार नाही अशी भूमिका सरकारने घेतली होती व राहुल यांना थोपवले होते. नेमका याचमुळे गदारोळ सुरू झाला आणि राहुल यांचा मुद्दा सर्वदूर पोहोचला. वास्तविक नरवणे यांच्या संपूर्ण पुस्तकातील अन्य बाबींत काहीही आक्षेपार्ह नसणार. लोकांना इंटरेस्ट होता तो केवळ गलवानमध्ये त्यावेळी घडलेल्या घडामोडींचा. पुस्तकाच्या दृष्टीने अडचणीचा भाग तोच. तोच सरकार आणि पुस्तकाचे प्रकाशक म्हणतात त्याप्रमाणे पुस्तक प्रकाशित न होताही उघड झाला आहे. गलवान संघर्षाच्या वेळी निर्णय घेणाऱ्यांनी विलंब केला. जेव्हा निर्णय घेतला तेव्हा तुम्हाला योग्य वाटेल ते करा असे निर्देश लष्कराला दिल्याचा तपशील उघड झाला आहे. केवळ एवढ्यावरून सरकारने बचावात्मक पवित्र्यात जाण्याची आवश्यकता नव्हती. 'हिंदी-चिनी भाई भाई,' अशी भूमिका सरकारने घेतली नव्हती आणि लष्कराला कारवाईपासून रोखलेही नव्हते. त्यामुळे सरकार खरेतर वादाचे मूळ ठरलेल्या पुस्तकातील या एकमेव वाक्यावर आपली टिमकी वाजवू शकले असते. ते त्यांना का जमले नाही किंवा उमगले नाही हे कोडेच. ते न जमल्यामुळे सरकार तोंडघशी पडले आणि राहुल गांधींना ॲडव्हान्टेज मिळाले. बुधवारी त्यांनी भूराजकीय संघर्ष व अमेरिकेसोबतचा व्यापार करार आदी विषयांवर सरकारला पार भिंतीला पाठ टेकेपर्यंत मागे रेटले. ज्याची सवयच नाही अशी कोंडी सातत्याने होत असल्यामुळे संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू सैरभैर झाले. विशेषाधिकार हनन प्रस्ताव आणण्याचे त्यांनी संसदेच्या बाहेर जाहीर केले. मात्र गुरुवारीच त्यांनी किंवा त्यांच्या कर्त्यांनी घुमजाव केले. ही माघार आहे व तेवढेच ते शहाणपणाचेही आहे. त्याचे कारण असे की विशेषाधिकार प्रस्ताव कोणत्या विषयावर आणला आहे ते नमूद करावे लागते.

# धुळेकरांना आता काळजी करण्याची गरज नाही!

## जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे प्रतिपादन; महापौर, उपमहापौरांनी स्वीकारला पदभार

प्रतिनिधी । धुळे



**धुळेकरांनी भाजपावर पुन्हा एकदा मोठा विश्वास दाखविला आहे. मागील निवडणुकीप्रमाणे यावेळीही भाजपाला स्पष्ट बहुमत दिले. कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी घेतलेल्या मेहनतीमुळे हे यश मिळाले असून आता महापौर, उपमहापौर आणि बहुसंख्य नगरसेवक भाजपाचेच असल्याने धुळेकरांना आता काळजी करण्याची गरज नाही. कामाच्या बाबतीत आम्ही कुठेही कमी पडणार नाही, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी दिली.**

धुळे महापालिकेच्या नवनिर्वाचित महापौर मायादेवी परदेशी व उपमहापौर जोत्स्ना पाटील यांनी नुकताच पदभार स्वीकारला. त्यानंतर ना.महाजन यांनी माध्यमांशी संवाद साधला. यावेळी ते बोलत होते. यावेळी आ.अनुप अग्रवाल, माजी खा.डॉ. सुभाष भामरे, भाजपाचे महानगराध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांच्यासह सर्व नगरसेवक, भाजपाचे पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

पुढे बोलतांना ना.गिरीश महाजन म्हणाले की, धुळे शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पुढील पाच वर्षांत कोणत्याही निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही. पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता व मूलभूत सुविधांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यात येतील, असेही ते यावेळी म्हणाले.

**कुणीही नाराज नाही...**

पक्षांतर करून भाजपात आलेल्या नगरसेवकांबाबत विचारलेल्या प्रश्नावर बोलतांना ना.महाजन यांनी, भाजपामध्ये जुने-नवे असा कोणताही भेदभाव केला जात नाही. जो भाजपात येतो, तो पक्षाचा घटक बनतो. सर्व नगरसेवकांना जबाबदाऱ्या देण्यात आल्या असून शहराच्या विकासाची धुरा सर्वांच्या खांद्यावर सोपविण्यात आली आहे. त्यामुळे कुणीही नाराज नसल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

### ➤ महिनाभरात प्रश्न लागेल मार्गी

शहरातील काही भागांमध्ये अद्यापही पाणीपुरवठा नियमित होत नसल्याच्या तक्रारी येत आहेत. त्या तक्रारी तातडीने दूर केल्या जातील. अक्कलपाडा धरणातील पाणीसाठा वाढविण्याचा प्रश्न येत्या महिनाभरामध्ये मार्गी लावण्यात येईल. ते खाते स्वतःकडे असल्याने धुळेकरांना भविष्यात मुबलक पाणी मिळेल, असा विश्वासही जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी व्यक्त केला.

## प्राथमिक शिक्षक संघाच्या जिल्हाध्यक्षपदी संदीप पाटील; सरचिटणीसपदी योगेश सनेर



प्रतिनिधी । चोपडा

**महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक संघाच्या जळगाव जिल्हाध्यक्षपदी जामनेर येथील संदीप जगन्नाथ पाटील यांची, तर सरचिटणीसपदी चोपड्याचे योगेश सनेर यांची निवड जाहीर करण्यात आली. तसेच मार्गदर्शक नेतेपदी अमळनेरचे वाल्मिक मराठे यांची नियुक्ती करण्यात आली. ही घोषणा राज्याध्यक्ष केशवराव जाधव, शिक्षक नेते माधवराव पाटील व राज्य पदाधिकारी पुस्तके सर यांच्या उपस्थितीत १४ फेब्रुवारी रोजी करण्यात आली.**

अजिंठा विश्रामगृह, जळगाव येथे झालेल्या बैठकीत टीईटी प्रश्नावर एकसंघ होण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. येत्या ५ ते ७ मार्चदरम्यान शिवाजी पार्क, मुंबई येथे होणाऱ्या शिक्षक महामंडळ सभेस सर्व संघटनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले. या सभेला मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री, शिक्षण मंत्री व शिक्षण राज्यमंत्री यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित राहणार आहेत. बैठकीत टीईटी परीक्षा रद्द करावी किंवा किमान गुणांची अट शिथिल करावी, जुनी पेन्शन योजना लागू करावी आदी मागण्यांवर एकमुखाने ठराव करण्यात आला. जळगाव जिल्ह्यात संघटनेला नव्या उमेदीने बळ देण्यासाठी युवा नेतृत्वाची गरज व्यक्त होताच संदीप पाटील यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची धुरा सोपविण्यात आली, तर अभ्यासू व संघटनात्मक कामात सक्रिय असलेल्या योगेश सनेर यांच्याकडे सरचिटणीसपदाची जबाबदारी देण्यात आली. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील शिक्षकांच्या प्रश्नांसाठी एकजुटीने लढा देण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी विविध शिक्षक संघटनांचे पदाधिकारी व शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वाळुमाफियांची तहसीलदारांना धक्काबुक्की

प्रतिनिधी । नंदुरबार

**अवैध वाळू वाहतुकीबाबत कारवाईसाठी गेलेल्या नंदुरबार तहसीलदारांना ट्रकचालकांनी धक्काबुक्की केल्याची घटना घडली. तहसीलदारसारख्या वर्ग एक अधिकाऱ्यावर अशाप्रकारे धक्काबुक्कीचे प्रकार घडत असतील तर वाळू तस्कर किती निर्ढावलेले आहेत याची प्रचिती येत आहे.**

याप्रकरणी उपनगर पोलीस ठाण्यात तहसीलदारांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तहसीलदार प्रदीपकुमार रावसाहेब पवार (वय-३४) यांनी दिलेल्या फिर्यादीत, अवैध वाळू वाहतुकीची तपासणी करण्यासाठी भरारी पथक गेले असता नंदुरबार शहरातील सी.बी पेट्रोल पंपाजवळ सार्वजनिक रोडवर एका ट्रकला अडवण्यात आले. कागदपत्रांची मागणी करण्यात आली. याप्रसंगी ट्रक चालक गौरव सुरेश महिरे (वय-२२) आणि क्लीनर पंकज राहुल बाविस्कर (वय-२६, दोन्ही रा. पहेलवाननगर, नंदुरबार) या दोघांनी अंगावर धावत येऊन तहसीलदार प्रदीप पवार यांना धक्काबुक्की केली. पथकातील कर्मचाऱ्यांना देखील त्यांनी धक्काबुक्की केली, असे म्हटले आहे.

दरम्यान गेल्या आठवड्यात अशाचप्रकारे कारवाईसाठी गेलेल्या महसूल कर्मचाऱ्याला धक्काबुक्की केल्याची घटना घडली होती. जिल्ह्यातील वाळू तस्करांची दादागिरी दिवसेंदिवस वाढत चालली असल्याचे दिसून येत आहे.

## वरणगाव येथे रेवा कुटीत संगीतमय सामूहिक हनुमान चालीसा पठण उत्साहात

प्रतिनिधी । वरणगाव



**अध्यात्म आणि विज्ञान यांचा सुंदर संगम असलेल्या रेवा कुटी या धार्मिक केंद्रात वार्षिक संगीतमय सामूहिक हनुमान चालीसा पठणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. ॐ सिद्धगुरु नित्यानंद प्रतिष्ठानतर्फे आयोजित या उपक्रमात मोठ्या संख्येने हनुमान भक्त सहभागी झाले होते.**

यावेळी प्रतिष्ठा महिला मंडळाच्या अध्यक्षा रजनी सावकारे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, नेत्रतज्ञ डॉ. नितु पाटील यांनी विज्ञान शाखेचे शिक्षण घेत असतानाही कठीण अशी नर्मदा माता परिक्रमा पायी पूर्ण करून अध्यात्म क्षेत्रात आपली निष्ठा सिद्ध केली आहे. त्यामुळे वरणगाव येथील रेवा कुटी हे विज्ञान आणि अध्यात्माचा दुहेरी संगम घडविणारे प्रेरणास्थान ठरत असल्याचे त्यांनी नमूद केले.

त्या पुढे म्हणाल्या की, वासुदेव परिवारातर्फे दर महिन्याच्या दुसऱ्या शनिवारी सकाळी ७ ते ९ या वेळेत संगीतमय सामूहिक हनुमान चालीसा पठणाचा उपक्रम राबविला जातो. हिंदू जनजागृतीसाठी हा उपक्रम उपयुक्त असून विविध मंदिरांमध्ये अशा उपक्रमांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. आगामी काळात ङ्गरेवा कुटीफयेथे भक्तांची संख्या लक्षणीय वाढेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमास तपटकाठोरा येथील सरपंच रोहिणी पाटील, प्रशांत पाटील, अतुल झांबरे यांची विशेष उपस्थिती होती.

## पान १ वरुन

**पुण्यात भाजपा-काँग्रेसचे......**

होऊन आमच्या अंगावर येण्याचा प्रयत्न काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी केला', असा आरोप भाजाच्या पदाधिकाऱ्यांनी केला. 'आजचा दिवस हा एकदम वाईट दिवस आहे, कारण पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे यांच्या उपस्थितीत काँग्रेस पक्षाच्या कार्यालयावर हल्ला करण्याचा प्रयत्न करण्यात आला', असं प्रशांत जगताप यांनी म्हटलं आहे. हर्षवर्धन सपकाळ यांचं वक्तव्य काय होतं? - हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं की, 'छत्रपती शिवाजी महाराजांनंतर त्यांच्या शौर्याप्रमाणेच, त्याच मांदियाळीत टिपू सुलतान आहेत. टिपू सुलतान यांनी इंग्रजांविरोधात लढा पुकारला होता. टिपू सुलतान हे शौर्य गाजवणारे एक योद्धे होते. ते भारताचे भूमिपूत्र होते. त्यांनी कधीही विषारी, विखारी विचारांना जवळ केलं नाही. ते एक शौर्याचं लक्षण म्हणून आपण टिपू सुलतान यांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या समकक्ष बघितलं पाहिजे', असं हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं होतं.

**फ्रान्समधील शिक्षकाचा ८९......**

व्हिडीओतून तपास यंत्रणांनी आतापर्यंत ४० पीडितांची ओळख पटवली आहे. हे प्रकरण उघडकीस येताच भारतासह संपूर्ण जगभरात एकच खळबळ उडाली आहे. ७९ वर्षीय आरोपी जॅक लेवुग्ल हा फ्रान्समधील ॲन्सी अल्पाइन शहरातील रहिवासी आहे. प्रगत साहित्याचे शिक्षण घेतल्यानंतर त्याने वयाच्या २१ व्या वर्षी फ्रेंच भाषेचा शिक्षक म्हणून काम करण्यास सुरुवात केली. कोणतीही अधिकृत पदवी नसताना आरोपीने १९६७ ते २०२२ दरम्यान जर्मनी, स्वित्झर्लंड, मोरोक्को, नायजर, अल्जेरिया, फिलीपिन्स, भारत, कोलंबिया, फ्रान्स व न्यू कॅलेडोनियासह अनेक देशांमध्ये शिक्षक म्हणून काम केले. त्याशिवाय तो गुहाशास्त्र (स्पेलिओलॉजी गुहांचा अभ्यास) शिकवणारा प्रशिक्षक म्हणूनही कार्यरत होता. या काळात आरोपी जॅकने अनेक अल्पवयीन मुलांसह काही तरुणींवर लैंगिक अत्याचार केले.

**कुंभमेळ्यात महिलांची......**

उपायुक्त किरणकुमार चव्हाण, नियोजन विभागाचे सहसंचालक योगेंद्र चौधरी, तहसीलदार अमोल निकम आदी उपस्थित होते. तर धुळे येथील पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, जळगाव पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी आदी दूरदृश्य संवाद प्रणालीच्या माध्यमातून या बैठकीत सहभागी झाले होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, आगामी सिंहस्थ कुंभमेळ्यात महिला भाविकांची संख्या मोठी राहील. या पार्श्वभूमीवर महिलांच्या संरक्षणासाठी पुरेशा उपाययोजना कराव्यात. महिलांसाठी मदत केंद्रे, हिरकणी कक्ष, स्वच्छता गृहांची सुविधा असावी. तसेच दिव्यांगासाठी विशेष उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी सूचित केले.

**रसायनांपासून दूध......**

अधिकारी बडे, उपनिरीक्षक समीर अभंग, अमलदार हृदय घोडके, संतोष खैरे, दीपक काटकर, गणेश लबडे, राहुल द्वारके, लक्ष्मण खोकले, फुरकान शेख, बिराप्पा करमल, शामसुंदर जाधव, भीमराज खडसे, राहुल डोके, भाऊसाहेब काळे, अमोल कोतकर, सुनील मालकर यांच्या पथकाने ही कारवाई केली. अन्नसुरक्षा अधिकारी रसायनयुक्त दुधाचे तसेच पांढरी पावडर, तेथे तयार केलेले उपलब्ध असलेले दूध याचे नमुने तपासणीसाठी पाठवले आहेत. पॅरॅफिन ऑइल व पांढऱ्या पावडरचा वापर करून दूध भेसळ केली जात असतानाच पथकाने छापा टाकल्याने मोठा मुद्देमाल हाती लागला आहे.

**नाशिक येथे २७ फेब्रुवारीपासून......**

आयोजन संमेलनात करण्यात येणार आहे. तसेच कविसंमेलन, सांस्कृतिक कार्यक्रम, लोककला सादरीकरणे, नाट्यप्रयोग, कथाकथन, पुस्तक प्रदर्शन, साहित्यिक संवाद तसेच युवा पिढीसाठी विशेष उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. मराठी साहित्य, कला व परंपरेचे दर्शन घडविणारी विविध प्रदर्शनेही या निमित्ताने भरविण्यात येणार आहेत. या संमेलनासाठी परदेशातून साहित्यिक हजर राहणार आहेत. यापूर्वीचे संमेलन पुणे येथे झाले. या संमेलनात पुस्तक आदान-प्रदान हा आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात आला. या संमेलनातही हा उपक्रम व्यापक स्तरावर राबविण्यात येईल. त्यासाठी नाशिककरांनी आपले योगदान द्यावे. त्यासाठी दहा रुपये वर्गणी ठेवण्यात येईल. या संमेलनाच्या मुख्य मंडपाचे कवी कुसुमाग्रज नगरी असे नामकरण करण्यात येईल. अन्य दालनांना मान्यवरांची नावे देण्यात येतील. मराठी भाषा गौरव दिन आणि ज्येष्ठ कवी कुसुमाग्रज यांच्या स्मृती दिन तसेच सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनाला विशेष महत्व असणार आहे.

## नगरसेवक सुनील चौधरी यांची तत्परता, लालबहादूर शास्त्री स्मारकाची तातडीने झाली स्वच्छता

प्रतिनिधी । धरणगाव



**येथील कोटबाजार परिसरातील भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या स्मारकाकडे नगरपालिकेचे दुर्लक्ष झाल्याचे चित्र निर्माण झाले होते. स्मारकाजवळ सुरू असलेल्या भाजी बाजाराच्या बांधकामामुळे खडी, रेतीचे ढीग तसेच कचरा साचल्याने परिसरात अस्वच्छता वाढली होती. यामुळे नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.**

ही बाब लक्षात येताच नवनिर्वाचित नगरसेवक सुनील चौधरी यांनी तातडीने नगरपालिकेच्या मुख्याधिकारी यांचे लक्ष वेधले. त्यांच्या पाठपुराव्यानंतर सफाई कर्मचाऱ्यांनी तत्काळ कारवाई करत परिसराची स्वच्छता मोहीम राबवली. जेसीबीच्या सहाय्याने खडी, रेती व साचलेला कचरा हटविण्यात आला. या स्वच्छता उपक्रमामुळे स्मारक परिसर आता स्वच्छ, नीटनेटका व नागरिकांसाठी सुलभ झाला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर नगरसेवक सुनील चौधरी आपल्या प्रभागातील प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देत असून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी ते सक्रिय असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या कार्यतत्परतेबद्दल स्थानिक नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

## मध्य रेल्वे भुसावळ विभागात तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी हिंदी कार्यशाळा यशस्वी



प्रतिनिधी । शिरपूर

**भुसावळ विभागात दि. १० ते १२ फेब्रुवारीदरम्यान तृतीय श्रेणी कर्मचाऱ्यांसाठी हिंदी कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. राजभाषा धोरणाची प्रभावी अंमलबजावणी आणि कार्यालयीन कामकाजात हिंदीचा अधिकाधिक वापर व्हावा, हा या कार्यशाळेचा मुख्य उद्देश होता.**

उद्घाटनप्रसंगी मंडळ यांत्रिक अभियंता व संपर्क राजभाषा अधिकारी युनुस अन्सार मकानू यांनी प्रमुख मार्गदर्शक डॉ. विभावरी गोरे, उपमहाप्रबंधक (राजभाषा) यांचे स्वागत करून त्यांच्या मार्गदर्शनाबद्दल आभार व्यक्त केले. दि. १२ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई येथे कार्यरत असलेल्या डॉ. गोरे यांनी राजभाषा धोरण या विषयावर सविस्तर व्याख्यान दिले. त्यांनी संविधानातील कलम ३४३ ते ३५१ मधील तरतुदींसह राजभाषा अधिनियम १९६३ आणि राजभाषा नियम १९७६ यांची माहिती सोप्या व व्यावहारिक पद्धतीने समजावून सांगितली. कार्यालयांमध्ये हिंदीचा प्रभावी वापर वाढविण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. उपस्थित कर्मचाऱ्यांनी कार्यशाळा उपयुक्त व प्रेरणादायी ठरल्याचे सांगितले. या उपक्रमामुळे दैनंदिन कामकाजात हिंदीचा वापर अधिक सक्षमपणे करता येणार असल्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## भारतीय बौद्ध महासभेची भुसावळ तालुका कार्यकारिणी जाहीर; अध्यक्षपदी राजेश आव्हाड यांची निवड



प्रतिनिधी । भुसावळ

**येथील शिलरत्न बुद्ध विहारात भारतीय बौद्ध महासभा जळगाव जिल्ह्याच्यावतीने आयोजित बैठकीत भुसावळ तालुका कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. जिल्हाध्यक्ष सुमंगल तथा रविंद्र अहिरे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.**

बैठकीच्या प्रारंभी तथागत भगवान बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करण्यात आले. तसेच माता भिमाई रामजी सपकाळे यांची जयंती साजरी करून वंदना घेण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा सरचिटणीस सुशीलकुमार हिवाळे यांनी केले. संस्थेच्या नियमाप्रमाणे निवड प्रक्रिया पार पाडण्यात आली. त्यानुसार बौद्धाचार्य राजेश भाऊराव आव्हाड यांची तालुका अध्यक्षपदी, आनंदमित्र सपकाळे यांची सरचिटणीसपदी तर संभाजी सोमा सोनवणे यांची कोषाध्यक्षपदी निवड करण्यात आली. याशिवाय विविध विभागांसाठी उपाध्यक्ष, सचिव व संघटक पदांचीही घोषणा करण्यात आली.

नवीन कार्यकारिणीने भुसावळ तालुक्यात ग्रामशाखा विस्तार, श्रामणेर शिबिरे, महिला शिबिरे तसेच संस्थेने निर्देशित २४ प्रकारची शिबिरे आयोजित करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित मान्यवरांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. आभार जिल्हा संघटक उत्तम सुरवाडे यांनी मानले .

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादक - सागर काशिनाथ ओतारी (मोबा.- ९९७००५३०६६) व मालक रेखाबाई काशिनाथ ओतारी यांनी श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स, पी -३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगाव -४२५००१ येथे छापून शॉप नं. ई-१२, चौथा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव- ४२५००१ (महाराष्ट्र), येथे प्रसिद्ध केले.
* कार्यकारी संपादक - किशोर शंकर शिंपी (* पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील) (RNI-MAHMAR/2023/89125) कार्यालय दूरध्वनी क्र. : ०२५७-२२२४०६६, E-Mail : shauryamarathi@gmail.com

# गॅस सिलिंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत तीन घरे जळून खाक

## तरुण कुढापा चौक परिसरातील घटना; लाखोंचे नुकसान झाल्याचा अंदाज

प्रतिनिधी । जळगाव

**जुन्या जळगाव भागातील तरुण कुढापा चौक परिसरात रविवारी (दि.१५) सकाळी १० वाजेच्या सुमारास एका घरात घरगुती गॅस सिलिंडरचा भीषण स्फोट होवून आग लागल्याची घटना घडली. या आगीत तीन घरे जळून खाक झाली असून लाखोंचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.**



तरुण कुढापा चौक परिसरात निलेश शंकर शिरसाट आणि बापू शंकर शिरसाट यांची घरे असून रविवारी (दि.१५) सकाळी १० वाजेच्या सुमारास त्यांच्या घरात अचानक आग लागली. प्राथमिक अंदाजानुसार, सुरुवातीला शॉर्ट सर्किट झाले आणि त्यानंतर गॅस सिलिंडरचा मोठा स्फोट झाला. हा स्फोट इतका भीषण होता की, आगीच्या ज्वाळांनी शेजारील घरांनाही वेढा घातला. लाकडी पार्टिशनची घरे असल्याने काही मिनिटांतच तिन्ही घरे आगीच्या भक्ष्यस्थानी पडली. घरातील संसारोपयोगी साहित्य, रोख रक्कम, सोन्याचे दागिने तसेच महत्त्वाची कागदपत्रे जळून खाक झाली. राहत्या घराची काही वेळातच राखरांगोळी झाल्याचे पाहून कुटुंबीयांना आपले अश्रू अनावर झाले होते. आगीची भीषणता पाहून स्थानिक नागरिकांनी मदतीसाठी धाव घेतली, मात्र आग आटोक्याबाहेर होती.

### ५ बंबांनी विझविली आग...

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशमन विभागाचे ५ बंब तातडीने घटनास्थळी दाखल झाले. या भागातील अरुंद रस्ते आणि आगीचे स्वरूप पाहता जवानांना सुरुवातीला अडचणी आल्या, मात्र शर्थीचे प्रयत्न करून त्यांनी आग आटोक्यात आणली. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही किंवा कोणालाही गंभीर दुखापत झाली नाही.

### ➢ तातडीने शासकीय मदत मिळावी

**घटनेची माहिती मिळताच नगरसेवक पियुष कोल्हे यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी आगग्रस्त कुटुंबांची भेट घेऊन त्यांना धीर दिला आणि प्रशासकीय मदतीसाठी पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, पीडित कुटुंबांना तातडीने शासकीय मदत मिळावी, अशी मागणी होत आहे.**

### ➢ महाबळ परिसरात भाजीपाल्याच्या दुकानाला भीषण आग

**जळगाव ।** महाबळ कॉलनीतील एका भाजीपाल्याच्या दुकानाला अचानक आग लागल्याची घटना शनिवारी (दि.१४) रात्री घडली. या आगीत दुकानातील फर्निचर, फ्रीजसह सर्व माल जळून खाक झाला. महाबळ कॉलनीत किरण महाजन यांचे भाजीपाल्याचे दुकान असून शनिवारी (दि.१४) रात्री १०.५० च्या सुमारास त्यांच्या दुकानातून धूर आणि आगीच्या ज्वाळा निघताना दिसल्या. आग लागल्याचे समजताच किशोर चावरे यांनी तातडीने अग्निशमन दलाला याबाबत माहिती दिली. त्यानंतर अग्निशमन दलाच्या तीन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी पाण्याचा मारा करून काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळवले. वाहनचालक देविदास सुरवाडे, मयूर ओतारी, प्रभाकर पाटील, फायरमन रोहिदास चौधरी, वृषभ सुरवाडे, यश मनोरे, चेतन सपकाळे, ऋषिकेश जाधव, गणेश महाजन, तेजस बडगुजर, सौरभ चिकटे, भूषण पाटील, मयूर पाटील आणि रजनीश भावसार आदी कर्मचाऱ्यांनी ही आग विझवली. दरम्यान, आगीचे नेमके कारण समजू शकलेले नाही.

# संस्कार व सांस्कृतिक विकासातूनच व्यक्तिमत्त्व घडते : पो.नि. सुनील पवार

## पी. आर. हायस्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

प्रतिनिधी । धरणगाव

**येथील शतकोत्तरी पी. आर. हायस्कूल येथे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात पार पडले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शालेय अभ्यासक्रमासोबतच सहशालेय उपक्रमांचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे प्रतिपादन पोलीस निरीक्षक सुनील पवार यांनी**



**उद्घाटनप्रसंगी केले. संस्कार आणि सांस्कृतिक जडणघडण ही व्यक्तिमत्त्व विकासाची भक्कम पायाभरणी ठरते, असे त्यांनी नमूद केले.**

प्रास्ताविक मुख्याध्यापक मेजर डी. एस. पाटील यांनी केले. डॉ. अरुण कुलकर्णी, डॉ. मिलिंद डहाळे, अजय पगारीया, नीनाताई पाटील, आर. जे. धनगर, मुख्याध्यापिका संगीता अहिरराव आदी मान्यवरांची उपस्थिती लाभली. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख गोपाल चौधरी, आर. एम. ठाकरे तसेच इयत्ता दहावीच्या विद्यार्थिनींनी केले. आभारप्रदर्शन जी. पी. चौधरी व एस. के. बेलदार यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

➢ स्नेहसंमेलनात महाराष्ट्राची लोकधारा तसेच विविध राज्यांच्या कला-संस्कृतीचे दर्शन घडविणारे लोकनृत्य, पोवाडा, लावणी, पारंपरिक नृत्य, आदिवासी व शेतकरी नृत्य, देशभक्तीपर गीत-नृत्य यांसारख्या बहारदार सादरीकरणांनी प्रेक्षकांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी भरभरून दाद देत प्रोत्साहनपर बक्षिसेही प्रदान केली.

# फळबाग, भाजीपाला, तेलबिया पिकांमध्ये उत्पादन वाढीसाठी मधमाश्या अत्यंत उपयुक्त

## ● मधमाशी पालन जनजागृती कार्यक्रमात संजय मारणे यांची माहिती

प्रतिनिधी । जळगाव

**फळबाग, भाजीपाला व तेलबिया पिकांमध्ये उत्पादन वाढीसाठी मधमाश्या अत्यंत उपयुक्त ठरतात. ज्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढण्यास मदत होते, अशी माहिती पुणे येथील इंडियन नॅचरल हनीबीजचे संचालक संजय मारणे यांनी केले.**



गांधी रिसर्च फाउंडेशन आणि जैन इरिगेशन सिस्टिम्स लि. यांच्या संयुक्त विद्यमाने मधमाशी पालन जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी यवतमाळ कृषी महाविद्यालयाचे अध्यक्ष प्रदीप वादाफळे, दिगंबर भुयार, विजय चोंडेकर, सेवानिवृत्त सहाय्यक वनसंरक्षक पी.टी. पाटील, जामनेरचे प्रगतीशील शेतकरी एस.आर. पाटील, जैन इरिगेशन कृषी विभागाचे संजय सोन्नजे, एनर्जी पार्कचे सीएसओ दीपक चौधरी, गांधी रिसर्च फाऊंडेशनचे सुधीर पाटील, लक्ष्मण देशमुख, जैन इरिगेशन वन वन्यजीव पर्यावरण विभागाचे सल्लागाराचे राजेंद्र राणे आदी उपस्थित होते.

कार्यक्रमात, एपिस सेरेना इंडिका, एपिस मेलिफेरा, एपिस डॉर्साटा, एपिस फ्लोरिया तसेच डंखरहित मधमाश्यांची माहिती देण्यात आली. एपिस डॉर्साटा या मोठ्या आकाराच्या मधमाश्या असून त्या उंच झाडे व इमारतींवर उघड्यावर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन जास्त असते, परंतु त्यांचे नियंत्रित व्यवस्थापन करणे कठीण असते. एपिस फ्लोरिया या लहान आकाराच्या मधमाश्या असून त्या झुडपांवर किंवा लहान फांद्यांवर पोळे बांधतात. त्यांचे मध उत्पादन कमी असले तरी परागीभवनात त्यांचा महत्त्वाचा वाटा असतो. तसेच मधमाश्यांपासून मिळणारी उपउत्पादने जसे की, मध, मेण, परागकण, रॉयल जेली, प्रोपोलिस आणि बी व्हेनम यांचे औषधी व आर्थिक महत्त्व स्पष्ट करण्यात आले. शेतीमध्ये परागीभवनासाठी मधमाश्यांचे अनन्यसाधारण महत्त्व अधोरेखित करण्यात आले. तसेच नो बीज नो फूड ही संकल्पना स्पष्ट करत पर्यावरण संतुलनात मधमाश्यांची भूमिका विशद करण्यात आली. मधमाशी पालनाची देखभाल, बॉक्स व्यवस्थापन, राणी मधमाशीचे महत्त्व, रोग नियंत्रण, हंगामी काळजी आणि शेतीपूरक व्यवसाय म्हणून मधमाशी पालन कसे फायदेशीर ठरते, यावर सविस्तर माहिती देण्यात आली.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व ४० सहभागींकडून 'मधमाशी संरक्षणाची शपथ घेण्यात आली.

# भाजपा उद्योग आघाडीची कार्यकारिणी जाहीर

## ● कार्यकारिणीत ३ उपाध्यक्ष, २ सरचिटणीसह १७ जणांचा समावेश

प्रतिनिधी । जळगाव

**भारतीय जनता पार्टी जळगाव जिल्हा उद्योग आघाडीची कार्यकारिणी जिल्हाध्यक्ष रविंद्र फालक यांनी गुरुवार, दि.१२ रोजी जाहीर केली. कार्यकारिणीत ३ उपाध्यक्ष, २ सरचिटणीस, ३ चिटणीस, १ सोशल मीडिया, १ प्रसिद्धी प्रमुख, ६ कार्यकारणी सदस्य अशा १७ जणांचा समावेश आहे.**







कार्यकारिणीत अध्यक्ष रविंद्र गेंदालाल फालक, उपाध्यक्ष निखील प्रल्हाद चौधरी, विनोद भगतसिंग शिंदे, महेश मोहन चौधरी, सरचिटणीस रोहित बद्रीप्रसाद अग्रवाल, जयंतीभाई प्रवीणभाई पटेल, चिटणीस श्रीहरी भिकन मराठे, प्रदीप बळवंतराव पाटील, विजय भागवत शिंपी, सोशल मीडिया लोकेश जगदीश भारवानी, प्रसिद्धी प्रमुख सुरेश महावीरप्रसाद सैनी, कार्यकारणी सदस्य लखन वासुदेव बुधानी, अमित पांडुरंग काळे, दीपक सुरेश परदेशी, शाळीग्राम त्र्यंबक मराठे, सतीष भिकुलाल अग्रवाल, कैलास काशिनाथ सोनवणे आदींचा समावेश आहे.

प्रदेश महामंत्री विजय चौधरी, विभाग संघटनमंत्री रवी अनासपुरे, खा.स्मिता वाघ, आ.राजूमामा भोळे, आ.मंगेश चव्हाण, आ.अमोल जावळे, जिल्हाध्यक्ष दीपक सूर्यवंशी यांच्या सुचनेनूसार ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

# बेंडाळे महाविद्यालयात पार पडले व्याख्यान

**जळगाव ।** लेवा एजुकेशनल युनियन संचलित डॉ.अण्णासाहेब जी.डी. बेंडाळे महिला महाविद्यालयात राज्यशास्त्र आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील सांस्कृतिक, भाषिक आणि सामाजिक-आर्थिक विविधता या विषयावर कला, वाणिज्य आणि गृहशास्त्र महाविद्यालयाच्या प्रा.निता पाटील यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रा.पाटील यांनी, भारतातील विविध संस्कृती, भाषा आणि सामाजिक-आर्थिक रचनेतील विविध पैलूंवर सखोल मार्गदर्शन केले.

# संस्कृत ही ज्ञान भाषा : सी.ए. प्रकाश पाठक

प्रतिनिधी । जळगाव

**काही भारतीय लोक तर काही विदेशी लोक संस्कृतला फक्त कर्मकांडाची भाषा आहे असे म्हणून हिणवतात. खरं पाहिलं तर संस्कृत फक्त कर्मकांडाची भाषा नव्हे तर ही गणिताची, रसायनशास्त्राची, चिकित्सा शास्त्राची, भौतिक शास्त्राची आणि स्पष्टपणे म्हटलं तर संगणकाची सुद्धा भाषा आहे. म्हणूनच संस्कृत एक ज्ञानभाषा आहे. असं माझंच नव्हे तर विजय भटकर सदृश्य मोठ्या विद्वानांचेही असेच मत आहे, असे प्रतिपादन सीए प्रकाश पाठक यांनी केले.**



मूळजी जेठा महाविद्यालयाचा संस्कृत विभाग व श्री समर्थ वागदेवता मंदिर (धुळे) यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय संगोष्ठीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केसीई सोसायटीच्या शैक्षणिक संचालिका डॉ.फडणवीस होत्या.

पुढे बोलतांना सीए पाठक यांनी, मॅकॉलेच्या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये संस्कृतला त्यांनी दूर करण्याचे पद्धतशीर प्रयत्न केले. कारण भाषा नाही तर ज्ञान नाही आणि म्हणूनच इंग्रजीला लोक कारण नसताना ज्ञान भाषा म्हणू लागले. आपल्या भारतीयांसाठी अत्यंत गर्वाची गोष्ट आहे की, आज किमान वर्तमान सरकारने अभ्यासक्रमामध्ये भारतीय ज्ञान परंपरा म्हणूनच चार क्रेडिटचा एक विषय ठेवण्याची मंजूरी दिली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी अधिष्ठाता प्राचार्य जगदीश पाटील, केसीई सोसायटीच्या शैक्षणिक संचालिका डॉ.फडणवीस, डॉ.व्ही. एस. कंची, प्रा.निलेश जोशी आदी मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले.

# 'आओ लकीरे मिटाए' या नाटकातून दिला एकतेचा संदेश

प्रतिनिधी । जळगाव

**रोटरी क्लब जळगावतर्फे 'आओ लकीरे मिटाए' या नाट्यप्रयोगाचे आयोजन करण्यात आले होते. विविध राज्यांतील विद्यार्थ्यांनी एकत्र येऊन सादर केलेल्या या नाट्यप्रयोगातून 'विविधतेत एकता' चा संदेश देण्यात आला.**




गांधी रिसर्च फाउंडेशनच्या पीजी डिप्लोमा विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या या नाटकाने उपस्थितांची मने जिंकली. या नाटकातून जात, धर्म, संप्रदाय, लिंगभेद आणि युद्ध-संघर्ष यांमुळे समाजात निर्माण होणाऱ्या दुराव्यांवर प्रकाश टाकत मानवतेच्या नात्याने एकत्र येण्याचा आणि कृत्रिम भिंती पुसून टाकण्याचा संदेश देण्यात आला.

यावेळी सुबोध सराफ व रेश्मा चांदवाणी यांनी मनोगत व्यक्त करतांना आजच्या विभाजित सामाजिक वातावरणात शांतता, सहिष्णुता आणि परस्पर सन्मान या मूल्यांची जपणूक करणे ही काळाची गरज असल्याचे सांगितले. नाटकात नेहा, जयश्री, पायल, सुशील, पुजा, मयूर, सागर, वैभव (महाराष्ट्र), आयुष (बनारस), रौनक, सतिश (उत्तर प्रदेश), आशिक (केरळ), अभिषेक (मध्य प्रदेश), भुपेंद्र (झारखंड), रुपक (त्रिपुरा), राखीकुमारी (बिहार) आदी कलाकारांनी भूमिका साकारल्या.

राष्ट्रपुरुषांच्या स्वप्नातील भारत घडविण्यासाठी महात्मा गांधी यांच्या विचारांचा स्वीकार आणि आचरण करणे अत्यावश्यक असल्याचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. जात, धर्म, संप्रदाय आणि लिंगभेद यांच्या पलीकडे जाऊन परस्पर सहकार्य व मानवतेच्या नात्याने समाजात शाश्वत शांतता प्रस्थापित करण्याचे आणि संघर्ष टाळण्याचे आवाहन नाटकातून करण्यात आले.

# कौशल्य विकासावर भर दिल्यास 'विकसित भारत' ही संकल्पना साकार होईल!

## ● विद्यापीठात आयोजित रोजगार मेळाव्यात प्रा.एस.टी. इंगळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी । जळगाव

**आत्मविश्वास, योग्य कौशल्य, प्रभावी संवाद कौशल्य आणि प्रामाणिकपणे काम करण्याची जिद्द हे गुण विद्यार्थ्यांमध्ये असतील तर तरूण कधीही बेरोजगार राहणार नाहीत. कौशल्य विकासावर भर दिल्यास 'विकसित भारत' ही संकल्पना निश्चितच साकार होईल, असे प्रतिपादन प्र-कुलगुरू प्रा.एस. टी. इंगळे यांनी केले.**



कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्ष व जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि.१२ रोजी सकाळी पंडीत दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन विद्यापीठातील पदवी प्रदान सभागृहात आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्याच्या अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते.

यावेळी मंचावर व्यवस्थापन परिषद सदस्य प्रा.पवित्रा पाटील, प्रा.जयदीप साळी, वाणिज्य आणि व्यवस्थापन विभागाचे अधिष्ठाता अनिल डोंगरे, जिल्हा कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहाय्यक आयुक्त संदीप गायकवाड, अधिसभा सदस्य प्रा. अजय पाटील, प्रा.विशाल पराते, समन्वयक प्रा.उज्ज्वल पाटील, सहसमन्वयक आर.आर चव्हाण आदी मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलतांना प्रा.इंगळे यांनी, गेल्या दोन वर्षांपासून आयोजित करण्यात येत असलेल्या रोजगार मेळाव्याला अत्यंत उत्स्फूर्त आणि सकारात्मक प्रतिसाद मिळत आहे. रोजगार मेळाव्याकडे केवळ नोकरी मिळविण्याची संधी म्हणून न पाहता, आपल्या करिअर घडविण्याच्या दृष्टीने तो एक महत्त्वाचा टप्पा आहे, या दृष्टीकोनातून पाहिले गेले पाहिजे, असे सांगत 'स्किल इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचे काम केले जात असल्याचे ते यावेळी म्हणाले.

### ■ ३८ विद्यार्थ्यांना देण्यात आले नियुक्ती पत्र....

या रोजगार मेळाव्यासाठी महाराष्ट्रासह राज्यातून ३० पेक्षा अधिक कंपन्यांनी सहभाग घेतला होता. युवाशक्ती फाऊंडेशन, हिताची अॅस्टीमो, उत्कर्ष फायनान्स बँक, दास ग्रृप ऑफ कंपनी, जैन इरिगेशन सिस्टीम लि., पोतदार इंटरनॅशनल सीबीएससी स्कूल, विवेकानंद प्रतिष्ठान स्कूल आदी कंपन्या, संस्थांचे प्रतिनीधी उपस्थित होते. या मेळाव्यासाठी १ हजार ३१५ जणांनी ऑनलाइन नोंदणी केली होती तर प्रत्यक्ष ६४७ विद्यार्थी उपस्थित होते. त्यापैकी ३८ विद्यार्थ्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले. तर २७२ विद्यार्थ्यांची प्राथमिक निवड करण्यात आली आहे. प्रास्ताविक आयुक्त संदीप गायकवाड यांनी केले तर आभार प्रा.उज्वल पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी सोनाली दायमा, संदीप कुमार आदींनी परिश्रम घेतले.

# कोथरूड येथे होणार भारतीय छात्र संसद

प्रतिनिधी । जळगाव

पुणे येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी आणि एमआयटी स्कूल ऑफ गव्हर्नमेंट यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय १५वी 'भारतीय छात्र संसद' दि.२१ ते २३ फेब्रुवारी दरम्यान कोथरूड येथील एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या विवेकानंद सभामंडपात होणार असल्याची माहिती भारतीय छात्र संसदचे विद्यार्थी समन्वयक विराज कावडीया यांनी दिली. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून वरिष्ठ पत्रकार पद्मश्री राजदीप सरदेसाई, मध्यप्रदेशचे माजी मुख्यमंत्री खा.दिग्विजय सिंह उपस्थित राहणार आहेत.

# आसाममधील होजाई जिल्ह्यात केंद्रीय योजनांचा आढावा

## केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांची लंका व लुमडिंग गावांना भेट





**प्रतिनिधी । होजाई (आसाम)**

**केंद्रीय मंत्री रक्षा खडसे यांनी आसाममधील होजाई जिल्ह्यात केंद्र शासनाच्या विविध योजनांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेतला. ईशान्य भारताच्या सर्वांगीण विकासाला विशेष प्राधान्य देण्यात येत असून, प्रत्येक योजनेचा लाभ तळागाळातील शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.**

बैठकीत केंद्र क्षेत्र योजना आणि केंद्र पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेत परिणामाधारित (Outcome-based) परीक्षणावर भर देण्यात आला. योजनांचे लाभ वेळेवर वितरित होऊन त्याचे दृश्यमान परिणाम दिसणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी होजाईचे जिल्हाधिकारी बिद्युत बिलाश भगवती तसेच विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. अंमलबजावणीतील अडचणी, आवश्यक समन्वय आणि कार्यपद्धतीतील सुधारणा यावर सखोल चर्चा झाली. यानंतर त्यांनी होजाई जिल्ह्यातील लंका आणि लुमडिंग गावांना भेट देत विद्यार्थिनी, घरकुल योजनांचे लाभार्थी आणि युवा खेळाडूंशी संवाद साधला. योजनांचा प्रत्यक्ष परिणाम जाणून घेत स्थानिक प्रशासनाला अधिक प्रभावी समन्वयासाठी निर्देश देण्यात आले.

> ईशान्य भारत देशाच्या प्रगतीचा महत्त्वाचा केंद्रबिंदू असून, येथील युवक व महिला विकसित भारतच्या वाटचालीला गती देतील. विकास हा केवळ कागदोपत्री न राहता तो वर्गखोल्यांपासून घरांपर्यंत आणि क्रीडांगणांपर्यंत पोहोचला पाहिजे, असे प्रतिपादन त्यांनी केले.

## शिवकमल शैक्षणिक व सामाजिक संस्थेतर्फे शिलाई मशीन वाटप

**प्रतिनिधी । एरंडोल**

तालुक्यातील उत्राण येथे शिवकमल शैक्षणिक व सामाजिक संस्थेचा नाविन्यपूर्ण उपक्रम शिवकमल शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या वतीने आज समाजातील गरजू व वंचित घटकातील महिलांना तसेच निराधार विधवा महिलांना, आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या दुर्बल घटकातील महिलांना रोजगार व स्वयंरोजगार मिळण्याच्या उदात्त हेतूने महिला सबलीकरण व सशक्तिकरण करण्याचे ध्येय बाळगून समाजातील काही महिलांना शिलाई मशीनचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी शिलाई मशीन वाटप करताना उपस्थित संस्थेचे अध्यक्ष अमोल गोविंदा महाजन, प्रदीप जाधव, दीपाली जाधव, सतीश पाटील व उपस्थित लाभार्थी रोशनी साळवे, निकिता गिरासे, कविता गिरासे, प्रतिभा पाटील, वैष्णवी राजपूत व आदी परिसरातील मान्यवर उपस्थित होते.

## थोडक्यात

### नगरदेवळा येथील जाळपोळप्रकरणी आरोपी जेरबंद

**पाचोरा ।** नगरदेवळा येथे महिलेच्या घरावर पेट्रोल टाकून आग लावून दहशत निर्माण करणाऱ्या सनसनाटी गुन्ह्याचा उलगडा स्थानिक गुन्हे शाखेने केला आहे. या प्रकरणी मुख्य सूत्रधारासह आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याकडून ९ चोरीच्या मोटारसायकली जप्त करण्यात आल्या आहेत. सदर गुन्हा पाचोरा पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ५७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३२६(ग) अन्वये दाखल आहे. फिर्यादी किरण राऊळ व त्यांच्या आई घरात झोपलेल्या असताना दोन अज्ञात इसमांनी घराच्या दरवाजावर पेट्रोल ओतून आग लावली होती.

### लोहारा येथे महाशिवरात्रीनिमित्त संगीतमय महाशिवपुराण कथा

**पाचोरा ।** तालुक्यातील लोहारा येथे शिवमहापुराण कथा दि. १४ फेब्रुवारीपासून सुरू झाली आहे. कार्यक्रम निर्विघ्न पार पडण्यासाठी ग्रामदैवत श्री तपेश्वर महादेव मंदिरात नारळ-निमंत्रण पत्रिका ठेवून विशेष निमंत्रण व पूजा झालेली आहे. यासाठी हर हर महादेव, श्री शिवाय नमस्तुभ्यमचा जयघोष करण्यात आला. यावेळी निलेश जोशी, भूषण शिवदे, गजानन क्षीरसागर, सुरेश माळी, गोकुळ माळी योगेश कोळी दत्तू माळी, बापू पाटील, रवींद्र क्षीरसागर, गजानन राजपूत, निलेश देशमुख, ईश्वर शिंदे आदी स्वयंसेवक हजर होते. या शिवमहापुराण कथेचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन समितीतर्फे करण्यात आले आहे. २२ फेब्रुवारीपर्यंत शिवमहापुराण कथा असेल, असे आयोजकांनी सांगितले.

## केळी पीकविमा योजनेत प्रामाणिक शेतकऱ्यांना बदनाम करू नका : एस.बी.पाटील यांची मागणी

**प्रतिनिधी । चोपडा**

**जळगाव जिल्ह्यातील केळी पीकविमा योजनेत कथित गैरप्रकारांबाबत सुरू असलेल्या चर्चेमुळे प्रामाणिक शेतकरी बदनाम होत असल्याची खंत व्यक्त करत शेतकरी संघटनेचे एस. बी. पाटील यांनी योजनेतील त्रुटी दूर करून पारदर्शकता वाढवण्याची मागणी केली आहे.**



जिल्ह्यात केळीची लागवड मृग व आंबिया या दोन्ही बहारांत केली जाते. मात्र पीकविमा केवळ आंबिया बहारात ३० ऑक्टोबरलाच काढला जातो. जूनमध्ये लागवड केलेल्या पिकाचाही विमा ऑक्टोबरमध्येच काढला जात असल्याने तफावत निर्माण होते. टिशू कल्चर रोपांची पहिली बाग ११ महिन्यांत तर दुसरी-तिसरी ९ महिन्यांत पूर्ण होते; म्हणजे २० महिन्यांत दोन पिके येतात. त्यामुळे विमा काढताना शेतात केळी अस्तित्वात असते, असे पाटील यांनी स्पष्ट केले.

विमा अर्जासोबत जिओ टॅगिंगचा फोटो जोडणे बंधनकारक असल्याने खोटा अर्ज करणे सोपे नसल्याचे त्यांनी सांगितले. बँका व विमा कंपन्यांना अर्ज तपासणीसाठी ६० दिवसांचा कालावधी असताना चार ते दहा महिने तपासणी लांबविणे चुकीचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. काही प्रतिनिधींकडून खोटे पंचनामे होतात, त्यामुळे योजना बदनाम होते, असेही ते म्हणाले.

या संदर्भात माजी मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील, माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे तसेच राष्ट्रवादीचे सुनील पाटील यांनीही चर्चा केली होती. तरीही ठोस निर्णय न झाल्याची खंत व्यक्त करत केळी पीकविमा दोन्ही बहारांत लागू करावा, अशी मागणी एस. बी. पाटील यांनी केली

## फेकरी येथे फॅमिली हेल्थ कार्डचा शुभारंभ

**प्रतिनिधी । भुसावळ**

तालुक्यातील फेकरी ग्रामीण भागातील कुटुंबांना परवडणारी व दर्जेदार आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने छत्रपती शाहू महाराज बहुउद्देशीय संस्था, जळगाव यांच्या वतीने फेकरी येथे फॅमिली हेल्थ कार्डचे वितरण उत्साहात पार पडले. दि. १३ रोजी ग्रामपंचायत कार्यालयात आयोजित या कार्यक्रमास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. अध्यक्षस्थानी सरपंच चेतना भिरूड होत्या.

## मागासवर्गीय प्राध्यापक संघटनेचे राज्यपालांना निवेदन

### समाजकार्य महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांच्या नियमित ऑनलाईन वेतनाची मागणी

**प्रतिनिधी । चोपडा**

**उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्तरीय व महाविद्यालयीन मागासवर्गीय प्राध्यापक संघटनेतर्फे समाजकार्य महाविद्यालयातील प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या नियमित ऑनलाईन वेतनाच्या प्रश्नावर राज्यपालांसह संबंधित प्रशासनाकडे निवेदन सादर करण्यात आले आहे.**

सदर निवेदन सी. पी. राधाकृष्णन, एकनाथ शिंदे, तसेच उच्च व तंत्रशिक्षण विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

फेब्रुवारी २०२४ पासून राज्यातील समाजकार्य महाविद्यालये समाज कल्याण विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे हस्तांतरित करण्यात आली आहेत. मात्र, या प्रक्रियेनंतरही कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या प्रलंबित आहेत. नियमित ऑनलाईन वेतन ही त्यातील प्रमुख समस्या आहे. एचटीई ङ्गसेवार्थफ प्रणालीमध्ये संबंधित कर्मचाऱ्यांचा अद्याप समावेश नसल्याने वेतन वितरणात सातत्याने विलंब होत असल्याचे संघटनेने नमूद केले आहे. शासन स्तरावरून डीडीओ असिस्टंट कोड निर्माण झाल्याशिवाय सेवार्थ प्रणालीत नावे समाविष्ट होऊ शकत नाहीत. त्यामुळे हा कोड तातडीने मंजूर करून प्रणाली अद्ययावत करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदनावर केंद्रीय अध्यक्ष प्रा. डॉ. जयवंत मगर, केंद्रीय सचिव प्रा. डॉ. अनिल हिवाळे व जळगाव जिल्हाध्यक्ष (प.वि.) प्रा. डॉ. राहुल निकम यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. प्रश्न न सुटल्यास राज्यपाल व मुख्यमंत्र्यांची प्रत्यक्ष भेट घेण्याचा इशाराही संघटनेने दिला आहे.

## ग्रामीण प्रीमियर लीगचा थरार; यहा ग्रो मेलाने संघ अजिंक्य!



**प्रतिनिधी । चोपडा**

**वैजापूरच्या मैदानावर रंगलेल्या ग्रामीण प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचा दिमाखदार समारोप उत्साहात पार पडला. ग्रामीण व आदिवासी पाड्यांवरील सुप्त क्रिकेट प्रतिभेला संधी देण्याच्या उद्देशाने सरपंच दत्ता पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. अंतिम सामन्यात यहा ग्रो मेलाने संघाने सरस कामगिरी करत विजेतेपदावर आपले नाव कोरले.**

सहा दिवस चाललेल्या या क्रिकेट महासंग्रामात एकूण १२ संघांनी सहभाग घेतला होता. प्रत्येक सामन्यात खेळाडूंनी दाखवलेली जिद्द आणि चुरस

- **सरपंच दत्ता पावरा यांच्या संकल्पनेतून आदिवासी व ग्रामीण खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ**

प्रेक्षकांसाठी पर्वणी ठरली. दररोज मैदानावर मोठी गर्दी होत होती.

अंतिम सामना बिरसा ब्रिगेड क्रिकेट क्लब (आश्रमशाळा कर्जाने) विरुद्ध यहा ग्रो मेलाने यांच्यात रंगला. दोन्ही संघांनी अटीतटीची लढत दिली; मात्र निर्णायक क्षणी यहा ग्रो मेलानेने बाजी मारली. विजेत्या संघाला रोख ३१ हजार रुपये व आकर्षक ट्रॉफी देण्यात आली, तर उपविजेत्या बिरसा ब्रिगेडला २१ हजार रुपये व ट्रॉफी प्रदान करण्यात आली. स्पर्धेत उत्कृष्ट खेळ करणाऱ्या आकाश मोरे याला मॅन ऑफ द मॅच आणि मॅन ऑफ द सिरीज या किताबांनी गौरविण्यात आले.

## श्री क्षेत्र लिंगेश्वर महाराज परिसरात महाशिवरात्रीनिमित्त महाप्रसादाचे आयोजन

**प्रतिनिधी । रांजणी, ता. जामनेर**

**येथून जवळच असलेल्या श्रीक्षेत्र लिंगेश्वर महाराज या जागृत ठिकाणी महाशिवरात्रीनिमित्त भाविकांची अत्यंत गर्दी होत असते. या जागृत ठिकाणी लांब लांबून भाविक भक्त या पावन तीर्थ ठिकाणी स्नान करण्यासाठी येतात.**

महाशिवरात्रीनिमित्त श्रीक्षेत्र लिंगेश्वर महाराज मंदिर येथे महारुद्र अभिषेक पूजा सकाळी ८ वाजता ठेवण्यात आला आहे. यावर्षी भाविक भक्तांसाठी श्रीक्षेत्र लिंगेश्वर महाराज सेवा समिती यांचेमार्फत सुमारे ५ क्विंटल साबुदाणा फराळ महाप्रसाद, उपवास आमटी, केळी व्हेपर, सकाळी १० वाजे पासून २५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत ठेवण्यात आलेला आहे. रात्री महाशिवरात्रीनिमित्त भजनाचा कार्यक्रम होईल. तरी पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन लिंगेश्वर महाराज सेवा समिती मार्फत करण्यात येत आहे. मंदिराकडे जाणारा रस्ता डांबरीकरण झाल्याने भाविकांनी ना गिरीषभाऊ महाजन यांचे आभार व्यक्त करीत मंदिर परीसरात भाविकांसाठी सभामंडप व्हावा अशी मागणी केली आहे.

## १८ फूट उंच कच्च्या केळ्यांपासून साकारलेल्या महाशिवलिंगाचे उद्घाटन

**प्रतिनिधी । चोपडा**

**महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, चोपडा यांच्या वतीने १८ फूट उंच भव्य महाशिवलिंग साकारण्यात आले असून त्याचे उद्घाटन डॉ. विकास हरताळकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. २१हजार १११ कच्च्या केळ्यांपासून पर्यावरणपूरक पद्धतीने तयार करण्यात आलेले हे शिवलिंग भाविकांसाठी विशेष आकर्षण ठरत आहे.**



महाशिवरात्री हा हिंदू धर्मातील अत्यंत पवित्र उत्सव मानला जातो. निराकार परमात्मा शिव यांच्या अवतरणाचा स्मरणदिन म्हणून या पर्वाचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केले जाते. उद्घाटनप्रसंगी प्रा. अरुणभाई गुजराथी, नगराध्यक्षा नम्रता पाटील, डॉ. विनीत हरताळकर, डॉ. सुरेश बोरोले, डॉ. पवन पाटील, हेमलता बोरोले, ॲड. निर्मल देशमुख, राजूभाई शर्मा, चंदुलाल पालीवाल तसेच ओम शांती केंद्राच्या संचालिका मंगला दिदी, सारिका दिदी, शितल दिदी, करिश्मा दिदी आदी मान्यवर उपस्थित होते. या अनोख्या उपक्रमासाठी सेवाधारी राजू पाटील, पंकज भाई, महेंद्र भोळे, डॉ. ईश्वर बोरसे, यशवंत चौधरी, कुणाल भाई, घनश्याम भाई, वसंत भाई, शिवाजी पाटील, जयेश पाटील, सौरभ भोळे तसेच कांचन भोळे, वंदना पाटील, उषा बोरसे, शुभांगी कापूरे, कल्पना पाटील, अनिता पाटील, नीलिमा पाटील, निर्मला पाटील आदींचा सहभाग लाभला.

## चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनच्या दोन शिपाईत मध्यरात्री ‘फ्री-स्टाईल’ हाणामारी

### एकाचे फुटले डोके तर दुसऱ्यांचा मोडला हात

**प्रतिनिधी । चोपडा**

**कायदा व सुव्यवस्थेचे रक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या चोपडा ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीत दोन पोलिस शिपायांमध्ये झालेल्या ‘फ्री-स्टाईल’ हाणामारीमुळे पोलिस दलाची शिस्त आणि प्रतिमा दोन्ही धुळीस मिळाल्याची चर्चा शहरासह तालुक्यात रंगली आहे.**




ड्युटी वाटपावरून सुरू झालेला वाद थेट सिनेस्टाईल मारहाणीपर्यंत पोहोचला, ही बाब अधिक धक्कादायक मानली जात आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, पोलिस कॉन्स्टेबल शशिकांत पारधी व कॉन्स्टेबल राकेश पाटील यांच्यात मध्यरात्री उशिरा जोरदार वाद झाला. वाद इतका टोकाला गेला की, दोघांनी एकमेकांवर तुटून पडत ग्रामीण पोलिस स्टेशनच्या हद्दीतच धूमश्चक्री घातली. या झटापटीत शशिकांत पारधी यांचे डोके फुटले, तर राकेश पाटील यांचा हात मोडल्याची माहिती आहे. जखमी पाटील यांना धुळे येथे हलविण्यात आले असून पारधी यांच्यावर चोपडा येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. गंभीर बाब म्हणजे, दोघेही मागील ५ ते ७ वर्षांपासून याच ठाण्यात कार्यरत असल्याचे सांगितले जाते. आर्थिक देवाण-घेवाणीवरून त्यांच्यात जुना वाद असल्याच्या चर्चा असूनही वरिष्ठांनी वेळेवर दखल घेतली नसल्याचा आरोप होत आहे. इतक्या मोठ्या प्रकारानंतरही अधिकृत गुन्हा दाखल न झाल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सामान्य नागरिकांवर किरकोळ कारणांवरून गुन्हे दाखल करणाऱ्या यंत्रणेने स्वतःच्या कर्मचाऱ्यांबाबत मात्र मौन बाळगल्याची टीका होत आहे. जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी यांनी या घटनेची तातडीने चौकशी करून जबाबदारी निश्चित करावी, संबंधितांवर कठोर कारवाई करावी आणि ठाण्यातील शिस्त अबाधित ठेवण्यासाठी ठोस पावले उचलावीत, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

## अडावदला महाशिवरात्रीनिमित्त प्रजापिता ब्रह्मकुमारी केंद्रातर्फे अमरनाथ गुफेचे दर्शन

**प्रतिनिधी ।** अडावद

**येथील प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय केंद्रात महाशिवरात्रीच्या पावन पर्वानिमित्त भव्य अमरनाथ गुफा दर्शन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. आध्यात्मिक वातावरणात साकारलेल्या या देखाव्याने भाविकांचे लक्ष वेधून घेतले.**



देशभरात महाशिवरात्रीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन होत असताना, या दिवसाचे पारमार्थिक महत्त्व लक्षात घेऊन केंद्रातर्फे विशेष आकर्षक अमरनाथ गुफेची प्रतिकृती उभारण्यात आली होती. यात अमरनाथ मंदिर येथील गुफेचा साज चित्तवेधक पद्धतीने साकारण्यात आला. ङ्गबाबा अमरनाथफ (बाबा बर्फानी) यांच्या दर्शनासाठी भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही नियोजन करण्यात आले होते. हर हर महादेवच्या घोषणांनी संपूर्ण परिसर शिवमय झाला होता. गुफेचे आध्यात्मिक रहस्य व महत्त्व ब्रह्मकुमारी केंद्राच्या प्रमुख कु. संगीता दिदी यांनी भाविकांना समजावून सांगितले. तसेच जवळील हरेश्वर मंदिर येथेही शेकडो भाविकांनी बाबा हरेश्वरांचे दर्शन घेऊन महाशिवरात्री उत्सवात सहभाग नोंदविला.